ePaper

महाविकास आघाडीत बिघाडी? मनसेला सोबत घेण्याबाबतचे मतभेद चव्हाट्यावर

वर्ष - 9 । अंक -89 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

www.mahaenews.com । शनिवार, दि. 22 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत


- 'सुपर ओव्हर'मध्ये बांगलादेशचा विजय
- लाईव्ह सामन्यात हाय व्होल्टेज ड्रामा!
- तेजस विमान कसं कोसळलं?
- नितीश कुमार यांनी गृह खातं सोडलं


### मंत्रिमंडळानंतरचा तणाव — शिंदे-फडणवीस समोरासमोर पण संवाद नाही

# शिंदे-फडणवीस यांच्यात का रे दुरावा!

## भाजपची ठाण्यातील आक्रमक कूटनीती शिंदेंसाठी डोकेदुखी

। मुंबई ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**राज्यातील सत्तेचा चेहरा बदलणाऱ्या एकनाथ शिंदेंना आता आपल्या घरच्या मैदानातच राजकीय धक्का बसतोय का? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील तणावाची चर्चा मागील काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात जोरात आहे. आज मुंबईतील एका शासकीय कार्यक्रमात दोन्ही नेते समोरासमोर आले, नमस्कार झाला, पण संवाद मात्र टाळला गेला. या घटनेनं "महायुती मजबुत की ताणलेली?" या प्रश्नाला पुन्हा धार दिली आहे.**



### आगामी स्थानिक निवडणुका निर्णायक

ठाणे, नवी मुंबई, बदलापूर, अंबरनाथ आणि कल्याण-डोंबिवली — येथे पुढील काही महिन्यांत निवडणुका आहेत. या निवडणुका महायुतीतील भविष्यातील सत्तासंतुलन ठरवणार आहेत.

आता राज्य राजकारणात मोठा प्रश्न : शिंदे-फडणवीस दूर राहतील की संवादाने तणाव संपेल? भाजपचा विस्तार थांबवण्यासाठी शिंदे कोणती रणनीती आखतील? आगामी निवडणुकांमध्ये महायुतीत संघर्ष होईल की सहकार? उत्तर शोधत राज्य उत्सुकतेने पाहत आहे.

**नाराजी कायम? दिल्ली दौऱ्यानं वाढवलीच चर्चा**

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर शिंदे आणि त्यांच्या शिवसेना शिंदे गटातील मंत्र्यांनी फडणवीस यांच्याकडे नाराजी व्यक्त केल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर लगेचच शिंदे दिल्लीला रवाना झाले आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी सत्तेतील संतुलन, पक्षविस्तारात भाजपची घुसमट आणि ठाण्यातील राजकीय समीकरणं यावर नाराजी व्यक्त केली असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात होत आहेत.

मात्र त्या भेटीनंतरही परिस्थिती सौम्य झाली नसल्याचे आजच्या प्रसंगातून दिसून आले.

**बिहारच्या शपथविधीतही संवाद कमी**

बिहारमधील नव्या सरकारच्या शपथविधी सोहळ्यात तीनही उपमुख्यमंत्री — देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे — उपस्थित होते. मात्र फडणवीस-अजित पवार हे एकत्र प्रवास करताना दिसले, तर शिंदे यांनी वेगळा प्रवास केला आणि कार्यक्रमानंतर एकटेच परतले. यानंतरच महायुतीत दोन गट तयार होत असल्याचे वातावरण राजकारणात रंगत आहे.



**शिंदेंचा अंदाज चुकतोय का? भाजपची रणनीती आक्रमक**

ठाणे हे शिवसेनेच्या राजकीय स्थापनेचे आणि विस्ताराचे केंद्र. शिंदे गटासाठी ते राजकीय घर आणि भावनिक किल्ला. मात्र आता परिस्थिती बदलत आहे. २०१४ नंतर भाजपने ठाण्यात हळूहळू मुळं मजबूत केली आणि आता ठाणे जिल्ह्यात भाजप शिंदेंना थेट आव्हान देण्याच्या भूमिकेत उतरला आहे. शिंदेंच्या बंडानंतर भाजपकडून काही न बोलला जाणारा पण मान्य असलेला एक समज होता – ठाण्यात भाजप आक्रमक येणार नाही आणि दोन्ही पक्ष एकमेकांचे नेते गळाला लावणार नाहीत. पण आता हे दोन्ही अलिखित नियम मोडले गेले आहेत.

**रविंद्र चव्हाणांचा झंझावात**

रविंद्र चव्हाण हे भाजपचे प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर ठाणे-कल्याण पट्टा त्यांच्या नेतृत्वात झंझावातासारखा बदलू लागला आहे. स्थानिक पातळीवर त्यांनी श्रीकांत शिंदे यांच्याशी निष्ठा असलेले, तसेच ठाकरे गटात गेलेले नेते परत आणण्याऐवजी भाजपमध्ये दाखल करून खेळ उलटा केला.

अगदी नुकतीच विधानसभा शिंदेंच्या विरोधात लढलेले दीपेश म्हात्रे देखील भाजपमध्ये दाखल झाले. हा प्रवेश सामान्य पक्षविस्तार नव्हे, तर स्पष्ट संदेश होता –

**"ठाण्यात आता भाजपचाच खेळ".**

यामुळे शिंदे गटात चिंतेचं वातावरण आहे. भाजपची फौज मैदानात — शिंदेसेनेसाठी पुढचा रस्ता कठीण ठाण्यात संजय केळकर, नवी मुंबईत गणेश नाईक, अंबरनाथ-बदलापुरात किसन कथोरे, कल्याण-डोंबिवलीत रविंद्र चव्हाण, तर ग्रामीण भागात कपिल पाटील — अशी भाजपची मोठी नेतृत्व संरचना आता सक्रिय झाली आहे.

यामुळे ठाणे जिल्ह्यात शिंदे पक्षाच्या राजकीय महत्त्वाकांक्षांना गंभीर धोका निर्माण झाला आहे.

**महायुतीमध्ये तणाव वाढतोय का?**

राजकीय निरीक्षकांचं म्हणणं आहे — "सत्ता मिळवताना एकत्र येणे सोपे असते, पण सत्ता वाटताना संघर्ष सुरू होतो. सध्या महाराष्ट्रात तो टप्पा स्पष्ट दिसतोय." शिंदे मुख्यमंत्री असताना भाजपने मर्यादा मानल्या. पण आता समीकरणं बदलली आहेत. भाजप राजकीय विस्तारात आक्रमक झाला आहे, आणि शिंदे सेनेचा किल्ला नेमका ठाण्यातच हलू लागला आहे.

**आगामी स्थानिक निवडणुका निर्णायक**

ठाणे, नवी मुंबई, बदलापूर, अंबरनाथ आणि कल्याण-डोंबिवली — येथे पुढील काही महिन्यांत निवडणुका आहेत. या निवडणुका महायुतीतील भविष्यातील सत्तासंतुलन ठरवणार आहेत.

**आता राज्य राजकारणात मोठा प्रश्न :** शिंदे-फडणवीस दूर राहतील की संवादाने तणाव संपेल? भाजपचा विस्तार थांबवण्यासाठी शिंदे कोणती रणनीती आखतील? आगामी निवडणुकांमध्ये महायुतीत संघर्ष होईल की सहकार? उत्तर शोधत राज्यभरातील जनतेला उत्सुकता लागली आहे.

## भाजपचा एक उमेदवार बिनविरोध

## २१ नगरसेवकपदाच्या जागांसाठी ६२ उमेदवार

# आळंदीत महायुतीतील मित्रपक्षांमध्ये लढत

## भाजपच्या तापकीर बिनविरोध

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आळंदी नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी प्रशांत कुऱ्हाडे (भाजप) आणि प्रकाश कुऱ्हाडे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या दोन पक्षांमध्ये चुरस आहे. कुऱ्हाडे यांच्यासह उमेश डरपे, सुरेश दौंडकर या दोन अपक्षांसह चौरंगी लढत होणार आहे. नगरसेवकपदासाठी प्रभाग क्रमांक आठमधून भाजपच्या सुजाता तापकीर बिनविरोध निवडून आल्या आहेत.**




नगरपरिषदेच्या निवडणुकीत दहा प्रभाग असलेल्या नगरसेवकपदाच्या २१ जागांसाठी भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), शिवसेना (शिंदे), शिवसेना (ठाकरे) अपक्षांसह ६२ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), तर काही ठिकाणी भाजप-शिवसेना (शिंदे) पक्षात लढत होत आहे.भाजपने सर्व जागांवर उमेदवार उभे केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिवसेना (शिंदे) पक्षाला सर्व जागेवर उमेदवार देता आले नाहीत. प्रभाग दोनमधील लढत रंगतदार होण्याची शक्यता आहे. मागीलवेळी भाजपकडून नगराध्यक्षपदी जनतेतून निवडून आलेल्या वैजयंता उमरगेकर यांच्यासमोर तीन उमेदवारांनी आव्हान निर्माण केले आहे.आळंदीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे माजी आमदार दिलीप मोहिते, माजी खासदार शिवाजीराव आढळराव-पाटील यांचे वर्चस्व आहे. भाजपचे संघटन मजबूत असून, जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद यांच्याकडे प्रभारी आणि भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्याकडे निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. सत्ता कायम राखण्यासाठी आमदार लांडगे, कंद यांची आणि सत्ता आणण्यासाठी मोहिते, आढळराव यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. प्रभाग क्रमांक एम जागा 'अ' मध्ये घोळवे प्रियंका युवराज, घुंडरे ऋतुजा आदित्य, घुंडरे ज्योती अक्षय, घुंडरे भाग्यश्री राम, 'ब' जागेसाठी घुंडरे आदित्य हनुमंत आणि घुंडरे सचिन रामकृष्ण यांच्यात लढत होईल. प्रभाग दोनमधील 'अ' जागेसाठी उमरगेकर वैजयंता अशोक, नेटके अनुपमा तुकाराम, नेटके योगिता तुषार, नेटके सोनू अनंता, 'ब' जागेसाठी भोसले रामचंद्र दत्तात्रय आणि भोसले सागर तुळशीराम यांच्यात लढत होईल.प्रभाग तीनमध्ये 'अ' जागेसाठी गोगावले आशा आशिष, घुंडरे पूजा संजय, 'ब' जागेसाठी कुऱ्हाडे योगेंद्र गोपाळ, कुऱ्हाडे सोमनाथ कुंडलिक, प्रभाग चार मधील 'अ' जागेसाठी कुऱ्हाडे पुजा अनिकेत, धुर्वे हिरकनी सुदाम, येळवंडे कांचन किरण, 'ब' जागेसाठी काशिद सुजित बबन, कुऱ्हाडे योगेश चंद्रकांत कुऱ्हाडे सागर निवृत्ती, सोळंकर सचिन पंढरीनाथ यांच्यात लढत होणार आहे. प्रभाग पाचमधील 'अ' जागेसाठी कुऱ्हाडे रोहन नंदकुमार आणि रासकर संतोष मारुती, 'ब' जागेसाठी कुऱ्हाडे कांचन उमेश, बोरुंदिया खुशी सागर यांच्यात दुरंगी लढत होणार आहे.प्रभाग सहामधील 'अ' जागेसाठी कुऱ्हाडे साक्षी अक्षय, वाघमारे लतिका ज्ञानेश्वर, 'ब' जागेसाठी कारेकर शिरीष शिवाजी, कुऱ्हाडे हेमंत गुलाबराव, बोराटे प्रसाद सुभाष, रंधवे रविंद्र राहुल यांच्यात चौरंगी लढत होणार आहे. प्रभाग सातमधील 'अ' जागेसाठी गरुड योगिता सुदीप, घुंडरे अरुणा ज्ञानेश्वर, चिताळकर पाटील ज्योती राहुल, वीर तेजस्वी ज्ञानेश्वर यांच्यात सामना रंगणार आहे.प्रभाग सातमधील 'ब' जागेसाठी अंतिम गुळूंजकर ज्ञानेश्वर मच्छिंद्र आणि घुंडरे सुनील ज्ञानेश्वर यांच्यात दुरंगी लढत होईल. प्रभाग आठमधील 'अ' जागेसाठी आवटे भागवत नारायण, कवडे रामप्रसाद सोपान, गिलबिले सचिन रामदास यांच्यात तिरंगी लढत होईलसोनवणे प्रियेश प्रफुल, सोनवणे संतोष लक्ष्मण, झोंबाडे सुरेश खंडेराव, 'ब' जागेसाठी गडदे आशा अमित, चव्हाण संगीता राहुल, चोरडीया माधवी राहुल, तापकीर आरती सुरेश, तापकीर ऋतुजा अनिकेत आणि 'क' जागेसाठी काळे उज्वला दिपक तापकीर शैला अविनाश, तापकीर सोनाली सचिन यांच्यात तिरंगी लढत होईल.

### प्रभागनिहाय होतील लढती?

दहा प्रभाग असलेल्या नगरसेवकपदाच्या २१ जागांसाठी भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), शिवसेना (शिंदे), शिवसेना (ठाकरे) अपक्षांसह ६२ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), तर काही ठिकाणी भाजप-शिवसेना (शिंदे) पक्षात लढत होत आहे.भाजपने सर्व जागांवर उमेदवार उभे केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिवसेना (शिंदे) पक्षाला सर्व जागेवर उमेदवार देता आले नाहीत.

# तळेगावमध्ये १९ नगरसेवक बिनविरोध

## तळेगावमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपची युती झाली

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि भाजपची युती झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे दहा आणि भाजपचे नऊ असे १९ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत.**



तळेगावातील १४ प्रभागामधून २८ नगरसेवक निवडून दिले जाणार आहेत. त्यात भाजपचे निखिल भगत, दीपक भेगडे, शोभा परदेशी, सिया चिमटे, अश्विनी शेळके, इंद्रकुमार ओसवाल, विनोद भेगडे, सागर बोडके, सुरेखा भेगडे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे संदीप शेळके, गणेश काकडे, हेमलता खळदे, आशा भेगडे, संतोष भेगडे, शैलजा काळोखे, सत्यम खांडगे, स्नेहा खांडगे,कमल टकले, सोनाली दरेकर यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. उर्वरित नगरसेवकपदाच्या नऊ जागांसाठी २८ उमेदवार रिंगणात आहेत. नगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)-भाजप युतीचे संतोष दाभाडे, अपक्ष उमेदवार माजी उपनगराध्यक्ष किशोर भेगडे, माजी नगराध्यक्षा ॲड. रंजना भोसले असे तीन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. किशोर भेगडे हे मावळमधून विधानसभेची अपक्ष निवडणूक लढविलेले बापूसाहेब भेगडे यांचे पुतणे आहेत. मागील निवडणुकीत नगरसेवकपदासाठी संतोष दाभाडे यांचा पराभव केला होता. आता नगराध्यक्षपदासाठी दाभाडे आणि भेगडे यांच्यात पुन्हा लढत होत आहे.राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपची युती झाली आहे. नगराध्यक्षपद पहिले अडीच वर्षांसाठी भाजपकडे आणि दुसऱ्या अडीच वर्षांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडे राहणार आहे. संतोष दाभाडे हे भाजपचे उमेदवार असले.

### शेळकेंचे बंधू बिनविरोध नाहीत

शेळके यांनी जाहीर केली आहे. त्यामुळे दाभाडे यांना निवडणूक आणण्यासाठी भाजपपेक्षा आमदार शेळके यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.भाजपचे माजी आमदार बाळा भेगडे यांचे बंधू दीपक भेगडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांचे चिरंजीव सत्यम खांडगे यांच्यासह १९ जण बिनविरोध निवडून आले आहेत. आमदार शेळके यांचे बंधू सुदाम शेळके हे प्रभाग आठमधून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांना बिनविरोध निवडून आणण्यासाठी आमदार शेळके यांनी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले.

विश्वविक्रमी 'रिव्हर सायक्लोथॉन' | शिवकालीन परंपरेचा थाट; मर्दानी खेळांचे जल्लोषमय सादरीकरण

# यंदा शिव-शंभू यशोगाथेची झंकार!

## आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतील 'रेकॉर्ड ब्रेक' उपक्रम

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**इंद्रायणी नदी स्वच्छतेचा जागर संदेश देण्यासाठी आयोजित केलेल्या 'रिव्हर सायक्लोथॉन 2025' या भव्य उपक्रमात यंदा सर्वांचे लक्ष वेधून घेणारा 'शिव-शंभू यशोगाथा' या विशेष कार्यक्रम ठरणार आहे. वारकरी परंपरा आणि पर्यावरणसंवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात शिवकालीन गौरवाचा भव्य आविष्कार यावर्षी पहायला मिळणार आहे.**




आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून प्रतिवर्षी इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉनचे आयोजन केले जाते. यावर्षी रविवार, दि. 23 नोव्हेंबर रोजी सकाळी 6 वाजता "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक परिसरातून सायक्लोथॉनची सुरुवात होणार आहे. याच वेळी शिव-शंभू गर्जनेने हा परिसर दुमदुमणार आहे. रणमर्द शिलेदारांचे संचलन, शिवकालीन मर्दानी खेळ, ढोल-ताशांचा ठेका आणि मशाल-दिवटी नृत्य अशा विविध सादरीकरणांनी शिवराज्यकालीन पराक्रमाची झलक सायकलपटू आणि नागरिकांना पहायला मिळणार आहे.

छत्रपती संभाजी महाराजांच्या जगातील सर्वात उंच 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' ला मानाचा मुजरा देण्यासाठी हजारोंच्या संख्येने नागरिक, सायकलपटू आणि शिवप्रेमी आवर्जून सहभागी झाले. शिवगौरव आणि पर्यावरणसंवर्धन यांचा सुंदर संगम घडवत 'शिव-शंभू यशोगाथा' हा कार्यक्रम उपक्रमाचे सर्वात मोठे आकर्षण ठरला आहे.

5 हजार सायकलपटू होणार सहभागी... अविरत श्रमदानचे डॉ. निलेश लोंढे म्हणाले, "शिव-शंभू यशोगाथा ही केवळ सादरीकरणांची मालिका नसून आपल्या इतिहासाची, संस्कृतीची आणि पराक्रमाची आठवण आहे.

या प्रेरणेने निसर्गसंवर्धन आणि नदी स्वच्छतेच्या कार्यात लोकांचा सहभाग अधिक मजबूत होईल. इंद्रायणी नदी ही आपली ओळख आहे आणि 35 हजार सायकलपटूंच्या माध्यमातून या संदेशाची प्रभावी जनजागृती होणार आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान संस्था, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात 5, 15 आणि 25 किमी अशा तीन ट्रॅकवर हजारोंनी सायकलस्वारांनी सहभाग नोंदवला आहे.

> "इंद्रायणी ही आपल्या संस्कृतीची जीवनधारा आहे. तिच्या स्वच्छतेसाठी जनसामान्यांनी एकत्र येणं ही काळाची गरज आहे. 'रिव्हर सायक्लोथॉन 2025' मधील 'शिव-शंभू यशोगाथा' हा आपल्या इतिहासाचा गर्व आणि पर्यावरणसंवर्धनाचा संदेश एकत्र घेऊन जाणारा अद्वितीय उपक्रम आहे. 35 हजारांहून अधिक सायकलपटूंचा उत्स्फूर्त सहभाग पाहून नदी संवर्धनाचा लढा निश्चितच अधिक बळकट होईल, अशी मला खात्री आहे. विशेष म्हणजे, यावर्षीची सायक्लोथॉन 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला समर्पित केली आहे. शिव-शंभूप्रेमी आणि सायकलपटूंसह तमाम पिंपरी-चिंचवडकरांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन करतो.
>
> -- **महेश लांडगे,** आमदार,भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# मिक्सरच्या धडकेत आणखी एका तरुणीचा बळी

## हिंजवडी–वाकड भागात 11 महिन्यांत 37 जणांचा मृत्यू; आयटीएन्स, सोसायटीधारकांच्या संतापाचा उद्रेक होणार!

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड शहरातील हिंजवडी परिसरात पुन्हा अपघाताची घटना घडली आहे. मारुंजीतील शिंदेवस्ती येथे शुक्रवारी (दि. २१) दुपारी कासारसाई धरणावरून घरी परतणाऱ्या तरुण-तरुणीच्या दुचाकीला भरधाव मिक्सरने दिलेल्या धडकेत तरुणीचा जागीच मृत्यू झाला, तर तरुण गंभीर जखमी झाला आहे. आहे.**



याच आठवड्यात जांबे येथे झालेल्या अपघातात डंपरच्या चाकाखाली असल्याने २० वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला आहे. पुण्यातील नवले पुलावरील अपघातानंतर हिंजवडी परिसरातील अवजड वाहनांमुळे होणरे अपघात पिंपरी चिंचवड शहरात चर्चेचा विषय बनले आहेत.

रिदा इमरान खान (वय १९, रा. विमाननगर, पुणे) हिचा मृत्यू झाला आहे. विवेक ठाकूर हा अपघातात गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. पोलिसांनी मिक्सर चालक अजमल अख्तर अन्सारी (वय ३२, रा. जांबे) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रिदा आणि विवेक हे कासारसाई धरणावरून दुचाकीने परतत असताना शिंदेवस्ती भागात मिक्सरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात इतका गंभीर होता की रिदाचा जागीच मृत्यू झाला. विवेकला गंभीर स्वरूपाच्या दुखापती असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### ५९ हजार वाहन चालकांवर कारवाई

वाहतूक शाखेने कडक पावले उचलत गेल्या ११ महिन्यांत ५९ हजार बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई केली आहे, तर यामधून साडेसहा कोटी रुपये दंड आकारण्यात आला आहे. तरीही नियमभंग आणि बेशिस्त वाहनचालकांवर अंकुश लागलेला नाही, असे चित्र दिसत आहे. सततच्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून अवजड वाहनांवरील निर्बंध, वेगमर्यादा अंमलबजावणी, वाहतूक व्यवस्थापन आणि रस्त्यांची सुधारणा यांसाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी. तसेच रात्रीच्यावेळी अवजड वाहतुकीला परवानगी द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### हिंजवडी-वाकड परिसरात अपघातांचे 'हॉटस्पॉट'

या घटनेने हिंजवडी व वाकड परिसरातील अपघातांची भीषणता पुन्हा स्पष्ट झाली आहे. गेल्या ११ महिन्यांमध्ये तब्बल ३७ जणांना प्राण गमवावे लागले आहेत. आयटी पार्क परिसरातील वाढती वाहनांची गर्दी, अवजड वाहनांची बेफिकीर धावपळ, वेगमर्यादा न पाळणे आणि वेगमर्यादांचे सर्रास उल्लंघन यामुळे मृत्यूचा हा आकडा वाढतच आहे.




# वेतन विषमतेचे भयंकर वास्तव

**'इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन'कडून 'जागतिक वेतन अहवाल २४-२५' नुकताच प्रकाशित झाला. या अहवालातील निरीक्षणे महत्त्वाची आहेत. उदा. जगात वास्तव 'जीडीपी'च्या वाढीचा दर 'वास्तव वेतनवाढी'च्या दरापेक्षा अधिक आहे. या व अशा काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा परामर्श घेणारा लेख.**

श्र मिकाच्या दृष्टीने 'वेतन' हा जिव्हाळ्याचा विषय आणि कळीचा मुद्दा असतो. त्यातही पुन्हा श्रमिक 'रोजंदारीवर' (वेतन श्रमिक) काम करणारा असेल तर तासाचा मोबदला किती व भाववाढ किती यातून त्या श्रमिकाचे 'जीवनमान' समजते. उदाहरणार्थ, श्रमिकाचे तासाचे वेतन दोनशे रुपये असेल आणि वस्तू आणि सेवांच्या किमती दुपटीने वाढल्या तर दोनशे रुपयांची खरेदीक्षमता निम्म्याने घसरते. याचा अर्थ दोनशे रुपये तासाच्या वेतनातून (पैसारूपी) शंभर रुपये किमतीच्याच वस्तू व सेवा खरेदी करता येतात. पैशाची ही घसरणारी क्रयशक्ती म्हणजे श्रमिकाचे 'वास्तव वेतन'. 'आयएलओ' (इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन) कडून नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'जागतिक वेतन अहवालातील (२०२४-२५) काही प्रमुख निरीक्षणांची नोंद घेणे आवश्यक आहे. वेतन श्रमिकाच्या वास्तव वेतनासंबंधीची, वास्तव वेतनाचा कल काय आहे व प्रदेश



आणि लिंगपरत्वे वेतन विभागणी कशी झाली आहे, हे मुद्दे अहवालात केंद्रस्थानी आहेत. मुख्य निरीक्षण असे की, जगात 'वेतन विषमता' कमी होते आहे. मात्र एकूणच जगात वास्तव वेतनवाढीचा दर वास्तव 'जीडीपी'च्या वाढीच्या दरापेक्षा कमी आहे. त्यामुळे वेतनविषमता कमी होऊनदेखील राष्ट्रीय उत्पन्नातील वेतनरूपी उत्पन्नाचा हिस्सा सातत्याने कमी होत चालला आहे. त्याचबरोबर १९९९ ते २००४ या कालावधीत अतिश्रीमंत देशांमध्ये श्रमिकांच्या उत्पादकतेतील वाढ त्यांच्या वास्तव वेतनदरातील वाढीपेक्षा अधिक आहे. (सरासरी), जागतिक वेतनवाढीवर चीनमधल्या वास्तव वेतन दरवाढीचा लक्षणीय परिणाम दिसून येतो. या अहवालात अभ्यासिलेल्या श्रमिकांमध्ये चीनमधल्या एक तृतीयांश श्रमिकांचा समावेश आहे. त्यामुळे चीनमधील वेतन श्रमिकांच्या वेतनदरातील वाढीमुळे जागतिक स्तरावर वेतनश्रमिकांच्या वेतनात लक्षणीय वाढ झाली आहे, असा गैरसमज होण्याची शक्यता अधिक आहे. २००६ ते २०२४ या कालावधीत चीनमधले वास्तववेतन जगातल्या अन्य देशांच्या तुलनेत अधिक वेगाने वाढल्याचे दिसून येते. या दोहोंमधल्या वाढीच्या दरातील फरक जवळजवळ दुप्पट आहे. भारत, थायलंड, व्हिएतनाम या आशियाई देशांच्या तुलनेतदेखील चीनमधला वास्तववेतनाचा दर अधिक आहे. व्हिएतनामच्या वास्तव वेतन दरवाढीचा कल चीनच्या जवळपास जातो. याउलट भारत आणि थायलंडमधील वास्तव वेतनवाढ फार प्रभावी दिसत नाही. कोविडनंतर आणि अलीकडच्या वर्षांमध्ये या दोन्ही देशांतील वास्तव वेतनवाढीचा दर घसरलेला दिसून येतो. या अहवालात 'वेतन विषमता मोजताना वरच्या उत्पन्नगटातील १० टक्के आणि तळातील ४० टक्के लोकांचा उत्पन्नातील हिस्सा किती, त्याचे मोजमाप काही गुणोत्तरांच्या आधारे केले आहे. यासंदर्भातील एक महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे सरासरीदृष्ट्या कमी उत्पन्नातील देशांमध्ये वेतनविषमता सर्वांत अधिक तर जास्त उत्पन्नगटात सर्वांत कमी असे वेतन विभागणीचे विषम चित्र दिसून आले. त्याचबरोबर चिंता वाटावी, असे निरीक्षण म्हणजे, अभ्यासिलेल्या सर्वच देशांमधील उत्पन्नगटांमध्ये पुरुषांचे वेतन स्त्रियांपेक्षा जास्त दिसून आले. त्याचप्रमाणे बहुतांश देशांमध्ये २००६ नंतर वेतनविषमता सातत्याने कमी होत आहे, असे आश्वासक चित्र आहे. लक्ष द्यावे असे आणखी एक निरीक्षण म्हणजे जरी जवळजवळ सर्वच देशांच्या बाबतीत वेतनविषमत्ता कमी झाली असली तरी कमी उत्पन्न असलेल्या गटातील देशांच्या बाबतीत वेतनविषमता कमी होण्याचे भाग्य दिसलेले नाही. अशा कमनशिबी देशांमध्ये भारताचे स्थान खूप वरचे आहे. भारताच्या संदर्भात वेतनविषमतेचे प्रमाण वाढलेले आढळते. एकूणच वाढत चाललेल्या वेतनविषमतेचा लक्षणीय परिणाम अल्पउत्पन्न गटातील देशांवर अधिक झाल्याचा अहवालातील निष्कर्ष आहे.

## असे कसे ?

### फळं कशी पिकतात?


***कच्ची कैरी खायलाही चांगली लागते. अशा कैरीचं पन्हें किंवा रायतं चवीन खाल्लं जातं.***

तरीही पिवळ्या झालेल्या, पिकलेल्या आंब्याची माधुरी काही औरच यात शंका नाही. कोणत्याही फळाची गोडी वाढून ते खाण्यासाठी अधिक योग्य बनवण्याची नैसर्गिक प्रक्रिया म्हणजे फळांचं पिकणं. झाडावर फुलांपासून फळ धरतं तेव्हापासून त्याचं आकारमान आणि घाट वाढत जातो. फुलांमधील किती बीजखंडांचं फलन झालं आहे यावर फळामध्ये किती बिया तयार होणार आहेत हे ठरतं. कधीकधी पर्याप्त बीजखंडांचं फलन होत नाही. त्यामुळे वाढत्या फळात पुरेशा बिया धरत नाहीत. अशा वेळी पुढची फळ पिकण्याची प्रक्रियाही कुठंतरी अडखळल्यासारखी होते. एरवी पर्याप्त आकारमानापर्यंत फळ वाढलं की त्याची आणखी वाढ होणं बंद होऊन पिकण्याची प्रक्रिया सुरू होते. सुरुवातीला टणक असलेला फळाचा गर मऊ व्हायला लागतो व त्याची गोडीही वाढत जाते. कच्च्या फळाचा रंग बहुधा हिरवा असतो; पण ते पिकायला लागलं की त्याचा रंगही बदलत जातो.

**भारताचे शेजारी देश काय किंवा आग्नेय आशियाई देश काय- राजकीय अस्थिरतेचे अनेक धक्के या देशांना आजवर बसलेले आहेत. तरीही सध्याची परिस्थिती कधी नव्हे इतकी गंभीर आहे कारण शेजारी देशांमधील अस्थैर्याच्या झळा काही प्रमाणात तरी भारतासही बसणार, हे आता दिसते आहे.**

# हवालदिल जगात भारत काय करू शकतो?

नेपाळमधला राजकीय संघर्ष आणि तेथे नवी राजकीय घडी बसवण्याचे प्रयत्न ताजेच आहेत पण बांगलादेशात वर्षभर उलटले तरी अशी नवी घडी काही बसत नाही, हे आपण पाहातो आहोत. आग्नेयेकडच्या थायलंड देशात पंतप्रधानांनाच न्यायालयीन आदेशामुळे पद सोडावे लागले आणि थायलंड- कंबोडियातील सीमावाद आता हिंसक पातळीला पोहोचला आहे. आपल्याला थायलंडपेक्षा म्यानमार जवळचा. तेथे तर ('आर्म्ड फोर्सेस लोकेशन ॲण्ड इव्हेन्ट डेटा' या संस्थेच्या विदेनुसार) सन २०२१ मध्ये आँग सान स्यू क्यी यांना पदभ्रष्ट करून आलेल्या लष्करी राजवटीनंतर आजवर ८० हजार सामान्यजन व सैनिक मारले गेले आहेत. भारताच्या पश्चिमेकडला पाकिस्तान हा तेथील सत्ताधाऱ्यांनीच खतपाणी घालून वाढवलेले इस्लामी अतिरेकी गट आणि रसातळाकडे जाणारी अर्थव्यवस्था, ती सावरण्यास असमर्थ असणारे प्रशासन यांत गोते खातो आहे. दक्षिणेकडला श्रीलंका हा देश गेल्या तीन वर्षांत,



तेथील राष्ट्राध्यक्षांच्या हकालपट्टीनंतर शांत दिसतो खरा. पण ती हकालपट्टी ज्या जनआंदोलनाच्या रेट्यानंतर झाली, त्या आंदोलनाची खदखद आर्थिक दुरवस्थेबद्दलही होती. ती अवस्था आजही कायम दिसते, कारण श्रीलंकेच्या आर्थिक प्रगतीचा वेग गेल्या तीन वर्षांत वाढल्याची काही चिन्हे नाहीत.

भारताच्या उत्तर सीमांना चीनच्या दंडेलीचा धोकाही आज कधी नव्हे इतका वाढला आहे.भारतासाठी ही संकटे उंबरठ्याबाहेरची मानून चालणार नाही. बांगलादेशातून येणाऱ्या निर्वासितांच्या प्रवाहामुळे भारताच्या पूर्वेकडील राज्यांमध्ये सामाजिक अस्वस्थता आणि व्यत्यय निर्माण होत आहे; पाकिस्तानकडून येणाऱ्या सीमापार दहशतवादाच्या कधीही न संपणाऱ्या धोक्यामुळे एप्रिल-मेमध्ये युद्ध भडकण्याची शक्यता निर्माण झाली होती; आणि आता नेपाळच्या अस्थिर राजकारणामुळे चीनला हस्तक्षेप करण्याची आणखी एक संधी मिळाली आहे. या ताण्याबाण्यांकडे दुर्लक्ष करणे खूप मोठे असल्याने, धक्क्यांच्या या एकामागोमाग, किंवा खरेतर एकाचवेळी- आणि त्याही अनेक दिशांनी येणाऱ्या लाटांना कसे तोंड द्यायचे हा प्रश्न भारतापुढे आज आहे. कारण अखेर, या एकंदर प्रदेशात काहीएक स्थैर्य निर्माण करण्यासाठी भारतालाही वाटा उचलावा लागणारच. तो कसा उचलायचा आणि किती हा प्रश्न आहे.नेपाळचे उदाहरण बोलके आहे. या देशाने दोन दशकांपूर्वीच्या माओवादी हिंसाचारापासून ते सर्वसंमत राज्यघटनेपर्यंत मजल मारली खरी पण वारंवार सत्ताधारी आघाड्यांत होणारे बदल, आलटून पालटून तेच चेहरे सत्तेत असणे असेच चालत राहिले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## पहिले येईल त्याला प्राधान्य

## ४,५०८ घर मिळविण्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू

# घर विक्री योजना सिडको कडून जाहीर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सिडको महामंडळाने तळोजा येथील घर विक्री होत नसल्याने पहिले येईल त्याला प्राधान्य या तत्वाने ४,५०८ घरांच्या विक्री योजना शुक्रवारी जाहीर केली. यामध्ये सर्वाधिक २,९७७ घरे ही तळोजातील आहेत.सिडकोच्या इतिहासात प्रथमच अशा पद्धतीची योजना जाहीर केली आहे. या योजनेची ऑनलाईन नोंदणी शनिवारी सायंकाळी ४ वाजल्यापासून सुरू होणार आहे. या योजनेअंतर्गत तळोजा, द्रोणागिरी, घणसोली, खारघर आणि कळंबोली नोड्स येथील सिडकोच्या गृहसंकुलातील उपलब्ध घरे आर्थिक दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) प्रधानमंत्री आवास योजना (पीएमवाय) अंतर्गत आणि अल्प उत्पन्न गटासाठी (एलआयजी) उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

## आवश्यक सुविधांनी सुसज्ज घर




.२२ लाख ते ३६ लाख या दरम्यान या घरांच्या किमती असणार असल्याचे सांगितले जात आहे. या योजनेची मुख्य वैशिष्ट्य म्हणजे अर्जदारांना इच्छेनुसार घर निवडण्याचे स्वातंत्र्य प्रथमच देण्यात आले आहे.सिडकोने विविध आर्थिक स्तरांतील नागरिकांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देत असल्याचा दावा केला आहे. या योजनेत ४,५०८ घरे उपलब्ध असून, त्यापैकी १,११५ घरे पीएमएवाय अंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांसाठी आणि अल्प उत्पन्न गटासाठी ३,३९३ घरे आहेत. तसेच पीएमवाय अंतर्गत ईडब्ल्यूएस घरांसाठी अडीच लाख रुपयांचे अनुदान सुविधा उपलब्ध आहे.ही सर्व घरे तयार स्थितीत असून अर्जदारांना इच्छेनुसार घर निवडता येणार आहे.

घरे 'पहिला येईल त्याला प्राधान्य' या तत्त्वावर विक्रीस आहेत. संपूर्ण रक्कम भरल्यानंतर तात्काळ ताबा देण्यात येणार आहे. कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर पात्र अर्जदारांना घर निवडण्याची संधी उपलब्ध होईल. ही गृहसंकुले नवी मुंबईतील विकसित नोड्समध्ये असून आवश्यक सुविधांनी सुसज्ज आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ तसेच उपनगरी रेल्वे, मेट्रो आणि महामार्ग सुविधा यांद्वारे उत्कृष्ट जोडणी उपलब्ध आहे.या योजनेच्या ऑनलाईन नोंदणीसाठी संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आली आहे: CIDCOFCFS.CIDCOINDIA.COM. घरांचे क्षेत्रफळ, दर आणि

## घराच्या स्वप्नाची पूर्तता करावी

या योजनेअंतर्गत तळोजा, द्रोणागिरी, घणसोली, खारघर आणि कळंबोली नोड्स येथील सिडकोच्या गृहसंकुलातील उपलब्ध घरे आर्थिक दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) प्रधानमंत्री आवास योजना (पीएमवाय) अंतर्गत आणि अल्प उत्पन्न गटासाठी (एलआयजी) उपलब्ध करून देण्यात आली आहेत..२२ लाख ते ३६ लाख या दरम्यान या घरांच्या किमती असणार असल्याचे सांगितले जात आहे.

इतर तपशील याच वेबसाइटवर उपलब्ध आहेत. ऑनलाईन नोंदणी २२ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ४.०० वाजता सुरू होईल. २१ डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदणी केलेल्या पात्र अर्जदारांसाठी घर निवडीची प्रक्रिया २८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू होईल.CIDCOने अर्जदारांना विनंती केली आहे की घरांची विक्री 'पहिला येईल त्याला प्राधान्य' या तत्त्वावर असल्याने निर्धारित वेळेत लवकरात लवकर नोंदणी करून आपल्या घराच्या स्वप्नाची पूर्तता करावी. या योजनेत CIDCOच्या गृहसंकुलातील सोयी-सुविधांनी सुसज्ज अशी ४,५०८ घरे उपलब्ध आहेत. या योजनेसाठी लॉटरी काढली जाणार नाही, तर अर्जदारांना त्यांच्या पसंतीचे घर निवडण्याची मुभा दिली आहे. त्यामुळे ते अक्षरशः आपले स्वप्नातील घर खरेदी करू शकतात. देशातील सर्वाधिक विकसित शहरांपैकी एक असलेल्या नवी मुंबईत घर खरेदी करण्याची संधी CIDCO पुन्हा आणत आहे. अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा अशी मी विनंती करतो."सिडको महामंडळाने तळोजा येथील घर विक्री होत नसल्याने पहिले येईल त्याला प्राधान्य या तत्वाने ४,५०८ घरांच्या विक्री योजना शुक्रवारी जाहीर केली. यामध्ये सर्वाधिक २,९७७ घरे ही तळोजातील आहेत.सिडकोच्या इतिहासात प्रथमच अशा पद्धतीची योजना जाहीर केली आहे. या योजनेची ऑनलाईन नोंदणी शनिवारी सायंकाळी ४ वाजल्यापासून सुरू होणार आहे.

# मुखेड नगर परिषदेत 'राष्ट्रवादी'चे घड्याळ बंद!

## एकही उमेदवार मिळाला नाही., दहा ठिकाणी पक्ष स्वबळावर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मागील वर्षभरात मोठा गाजावाजा करत जिल्ह्यात पक्षविस्तार करणार्‍या राष्ट्रवादी काँग्रेसने लोहा आणि कंधार नगर परिषदेत मोठा जोर लावलेला असताना शेजारच्या मुखेड नगरपरिषदेमध्ये मात्र या पक्षाचे घड्याळ बंद पडले. नगराध्यक्ष तसेच नगरसेवकपदासाठी या पक्षाला एकही उमेदवार मिळाला नाही.**

मुखेडचे दोन माजी आमदार या पक्षामध्ये सक्रिय आहेत; पण त्यांतील एकाच्या पुतण्याने भाजपाची उमेदवारी घेतली आहे.. काँग्रेसचे अविनाश घाटे तसेच शिवसेनेचे सुभाष साबणे हे दोन माजी आमदार, काँग्रेसच्याच माजी जि.प.अध्यक्ष वैशाली चव्हाण त्यांचे पती स्वप्रील व श्वशूर शेषराव चव्हाण तसेच जि.प.चे माजी सभापती व्यंकटराव गोजेगावकर हे नेते आपल्या समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कार्यरत आहेत. चव्हाण परिवार तसेच साबणे यांच्या प्रवेशासाठी पक्षाध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार हे मागील काळात मुखेड व देगलूरला आले होते; पण मुखेडच्या नेत्यांना नगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारांची जमवाजमव करता आली नाही. त्यामुळे या सर्वांचे स्थानिक नेते आमदार प्रताप पाटील



चिखलीकर, पक्षाचे जिल्हाध्यक्ष शिवराज होटाळकर यांची नाचक्की झाली असून चिखलीकरांचे अनेक दावे फोल ठरले आहेत.मुखेड मतदारसंघात भाजपाचे नेतृत्व आ.डॉ.तुषार राठोड यांच्याकडे आहे. त्यांनी नगराध्यक्ष तसेच नगरसेवक पदासाठी उमेदवारांची निवड करून प्रभागनिहाय नियोजनबद्ध प्रचार सुरू केला तर दुसरीकडे राष्ट्रवादीने मुखेडची जबाबदारी सुभाष साबणे यांच्यावर टाकली होती; पण अर्ज दाखल करण्याची मुदत संपेपर्यंत या पक्षातर्फे नगराध्यक्षपदाची

## मुखेडची जबाबदारी साबणे यांच्यावर

.मुखेड नगर परिषदेच्या निवडणुकीत मित्रपक्षांपैकी कोणाशीही युती करायची नाही, अशी भूमिका भाजपा आमदार डॉ.तुषार राठोड यांनी सुरुवातीलाच घेतली. गेल्यावर्षी विधानसभा निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने राठोड यांच्या विरोधातील बालाजी खतगावकर यांच्यासाठी काम केले होते.

निवडणूक लढविण्यास एकही इच्छुक समोर आला नाही. नगरसेवकपदासाठी या पक्षाकडून केवळ एकाने पक्षाचा 'बी फॉर्म' नेला, अशी माहिती समोर आली आहे.माजी आमदार अविनाश घाटे हे मागील अनेक वर्षांपासून नांदेड-मुखेड अशी ये-जा करत राजकारण करतात. नगरपालिका निवडणुकीसंदर्भातील चर्चा त्यांच्या मुखेड येथील घरामध्येच झाल्या. निवडणूक प्रक्रियेदरम्यान पक्षाचे जिल्हाध्यक्ष मुखेडमधील हालचालींची सतत माहिती घेत होते. नगराध्यक्ष व इतर पदांसाठी उमेदवार उभे करा, अशी सूचना आ.चिखलीकरांकडून दिली जात होती; पण मुखेडच्या दोन माजी आमदारांना पक्षाचे घड्याळ सुरू ठेवता आले नाही.

तेजस विमानाचा अपघात

## विमान दुबईमध्ये एअर शो दरम्यान कोसळले

# तेजस विमान कसं कोसळलं?

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दुबईमध्ये एअर शो प्रात्यशिकात भाग घेतलेल्या तेजस विमानाचा अपघात झाला आहे. दुपारी एअर शो सुरू असताना तेजस लढाऊ विमान कोसळले. यातील वैमानिकाचा मृत्यू झाला असल्याची माहिती हवाई दलाने दिली आहे. याचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. 'हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेड'ने (एचएएल) तयार केलेले हे विमान शुक्रवारी दुपारी स्थानिक वेळेनुसार २.१० वाजता हवाई कसरती करत असताना कोसळले.**

## व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल



पाहण्यासाठी मोठी गर्दी उसळलेली होती.भारतीय हवाई दलाने सदर अपघाताची कबुली दिली असून अधिक तपशील अद्याप समोर आलेला नाही. हवाई दलाच्या निवेदनात म्हटले, "दुबई एअर शो-२५ मध्ये भारतीय हवाई दलाचे तेजस विमान कोसळले. अधिक तपशीलाची खात्री केली जात आहे, लवकरच संपूर्ण माहिती दिली जाईल."व्हायरल व्हिडीओ अपघाताची भीषणता दिसून येत आहे. आकाशातून वेगात येणारे तेजस जमिनीवर कोसळल्यानंतर लगेचच आगीचा गोळा आणि त्यानंतर काळा धूर वर आल्याचे पाहायला मिळत आहे. या अपघातानंतर एअर शो पाहायला आलेल्या प्रेक्षकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. अपघात होण्यापूर्वी वैमानिक सुरक्षित बाहेर पडण्यात यशस्वी झाला की नाही, याची स्पष्टता अद्याप झालेली नाही.

तेजस विमानाची वैशिष्ट्ये काय? जगातील सर्वात लहान लढाऊ विमान म्हणून तेजस विमानाची ओळख आहे. १९८३ ला या लढाऊ विमानाच्या कार्यक्रमाला मंजुरी मिळाली. त्यानंतर या प्रकल्पाला विविध कारणांनी खूप विलंब होत गेला. जानेवारी २००१ मध्ये विमानाने पहिल्यांदा आकाशात झेप घेतली. विविध प्रकारच्या तेजसची निर्मिती करत, सुधारणा करत, चाचण्या करत अखेर २०१५ मध्ये नव्या आवृत्तीचे तेजस १ (TEJAS 1) लढाऊ विमान भारतीय वायू दलाच्या सेवेत दाखल करण्यात आले. सध्या ३० 'तेजस १' वायू दलात कार्यरत आहेत. तर तेजस 'एमके १ए' ही तेजसची नवी आवृत्ती, काहीसे आणखी आधुनिक तेजस तयार करण्यात आले असून त्याचे उत्पादन सुरु आहे. ध्वनीच्या वेगाच्या १.८ पट वेगाने उड्डाण करण्याची तेजसची क्षमता असून एका पल्ल्यात तीन हजार किलोमीटरपर्यंत अंतर तेजस विमान पार करु शकते. जमिनीवरुन हवेत, जमिनीवर मारा करण्याची क्षमता असलेली विविध क्षपणास्त्रे तसेच बॉम्ब वाहून नेण्याची क्षमता यात आहे. डॉग फाईट म्हणजेच हवेतल्या हवेत दुसऱ्या लढाऊ विमानाशी लढण्याची अनोखी अशी क्षमता तेजसमध्ये आहे. अशी सुमारे नव्या आवृत्तीतील १४१ तेजस लढाऊ विमाने येत्या काळात वायू दलात दाखल होणार आहेत.दुबई एअर शो २०२५ मध्ये शुक्रवारी धक्कादायक घटना घडली. हवाई प्रदर्शन सुरू असताना भारतीय बनावटीच्या तेजस या लढाऊ विमानाचा अपघात झाला. काही सेकंदात तेजस जमिनीवर कोसळले. यात वैमानिकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. दुबईच्या अल मकतूम आंतरराष्ट्रीय विमानतळावर ही घटना घडली. यामुळे प्रदर्शन पाहायला आलेल्या प्रेक्षकांमध्ये घबराट पसरली. भारतीय हवाई दलाने आता या घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. हवाई दलाने काय म्हटले? हवाई दलाच्या एक्सवर पोस्ट शेअर करण्यात आली आहे. यात म्हटले, "एअर शोदरम्यान तेजसचा अपघात झाला. यात वैमानिक गंभीर जखमी झाला होता. ज्यात त्याचा मृत्यू झाला. सदर जीवितहानीबद्दल आम्हाला तीव्र दुःख होत आहे. शोकाकुल कुटुंबियाप्रती संवेदना व्यक्त करतो."दुबई मीडिया ऑफिसने अपघात स्थळाचा एक फोटो एक्स हँडलवर शेअर केला आहे.

## वैमानिकाचा मृत्यू

यामध्ये तेजस विमानाचा ढिगारा दिसून येत आहे. दुबईच्या अल मकतूम आंतरराष्ट्रीय विमानतळावर स्थानिक वेळेनुसार दुपारी २.१० संयुक्त अरब अमिराती (युएई) सरकारने सांगितले की, अग्निशमन आणि आपत्कालीन पथकांनी अपघातानंतर तातडीने प्रतिसाद दिला आणि घटनास्थळाची परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. वाजता तेजस विमान कोसळले.दुबईमध्ये एअर शो प्रात्यशिकात भाग घेतलेल्या तेजस विमानाचा अपघात झाला आहे. दुपारी एअर शो सुरू असताना तेजस लढाऊ विमान कोसळले.

# नितीश कुमार यांनी गृह खातं सोडलं

## बिहार सरकारच्या मंत्रिमंडळात भाजपाच्या पारड्यात वजनदार खाती

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिहार सरकारच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडल्यानंतर आज दुसऱ्या दिवशी खातेवाटप जाहीर करण्यात आले. दोन दशकानंतर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी गृहखाते सोडले आहे. उपमुख्यमंत्री आणि भाजपाचे नेते सम्राट चौधरी यांच्याकडे या महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे.**

खातेवाटपाची यादी आज राज्यपाल आरीफ मोहम्मद खान यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. सम्राट चौधरी यांच्याकडे गृहखाते देण्यात आल्यामुळे मंत्रिमंडळावर भाजपाची स्पष्टपणे पकड दिसून येत आहे.

दुसरे उपमुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा यांच्याकडे खाण आणि भूगर्भशास्त्र विभाग, जमीन आणि महसूल तर रामकृपाल यादव यांच्याकडे कृषी खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. भाजपाच्या मंत्र्यांकडे मोठी खाती असल्याचे दिसून येत आहे. गृह, आरोग्य, रस्ते बांधकाम आणि कृषी यासह अनेक महत्त्वाची मंत्रालये भाजपाने स्वतःजवळ ठेवली आहेत.नितीश कुमार यांनी दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी ही यादी जाहीर करण्यात आली



आहे.२६ जणांच्या या मंत्रिमंडळात भाजपाचे १४, जदयूचे ९, लोजप (रामविलास) २, एचएएम आणि आरएलएम पक्षाला प्रत्येकी दोन मंत्रिपदे देण्यात आलेली आहेत. बिहार निवडणूक निकाल बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपा, जनता दल (युनायटेड) आणि लोक जनशक्ती (रामविलास) पक्षाने जोरदार विजय मिळवत विरोधकांचे अशरक्षः पानिपत केले. एनडीएने स्पष्ट बहुमताचा आकडा पार केला. भाजपाने जदयुला बरोबर जोरदार मुसंडी मारल्याचे या निकालावरून दिसून आले. भाजपाने सर्वाधिक ८९ तर जदयुने ८५ जागांवर विजय मिळवला. बिहार सरकारच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडल्यानंतर आज दुसऱ्या दिवशी खातेवाटप जाहीर करण्यात आले. दोन दशकानंतर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी गृहखाते सोडले आहे. उपमुख्यमंत्री आणि भाजपाचे नेते सम्राट चौधरी यांच्याकडे या महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. खातेवाटपाची यादी आज राज्यपाल आरीफ मोहम्मद खान यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. सम्राट चौधरी यांच्याकडे गृहखाते देण्यात आल्यामुळे मंत्रिमंडळावर भाजपाची स्पष्टपणे पकड दिसून येत आहे.

## यादी जाहीर करण्यात आली

भूगर्भशास्त्र विभाग, जमीन आणि महसूल तर रामकृपाल यादव यांच्याकडे कृषी खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे.भाजपाच्या मंत्र्यांकडे मोठी खाती असल्याचे दिसून येत आहे. गृह, आरोग्य, रस्ते बांधकाम आणि कृषी यासह अनेक महत्त्वाची मंत्रालये भाजपाने स्वतःजवळ ठेवली आहेत.नितीश कुमार यांनी दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी ही यादी जाहीर करण्यात आली आहे.

# ‘रसोडे में कौन था?’ फेम यशराज मुखाटे अडकला लग्नबंधनात

कोरोना काळात स्वतःच्या वेगळ्या शैलीमुळे घराघरात पोहोचलेला आणि प्रसिद्ध झालेला संगीतकार, गायक म्हणजे यशराज मुखाटे. संवादावरून मजेशीर गाणी बनवून त्याने प्रेक्षकांच्या मनात एकच वेगळं स्थान निर्माण केलं. ‘रसोडे में कौन था?’, ‘त्वाड्डा कुत्ता टॉमी, साड्डा कुत्ता, कुत्ता’ अशी बरीच मजेशीर गाणी त्याची जगभरात हिट झाली. त्यामुळे सोशल मीडियावर त्याचा मोठा चाहता वर्ग आहे. असा हा प्रसिद्ध यशराज मुखाटे आज लग्नबंधनात अडकला आहे. त्याने ही आनंदाची बातमी सोशल मीडियाद्वारे शेअर केली आहे.गेल्या बऱ्याच दिवसांपासून अनेक कलाकार लग्नगाठ बांधून आयुष्याच्या नव्या वाटेवर पाऊल ठेवताना दिसत आहेत. आता यादीत यशराज मुखाटेचं नाव सामील झालं आहे. त्याच्या लग्नाचा पहिला फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.यशराजने नोंदणी पद्धतीत गर्लफ्रेंड अल्पनाशी लग्न केलं आहे. लग्नाचा पहिला फोटो शेअर करत यशराज म्हणाला की,



आज दोन मोठ्या गोष्टी घडल्या. एक म्हणजे अल्पना आणि मी नोंदणी पद्धतीत लग्न केलं. तर दुसरी म्हणजे माझं नवीन गाणं प्रदर्शित झालं आहे, ‘मन धागा’. याची लिंक बायोमध्ये दिली आहे.दरम्यान, यशराजच्या या पोस्टवर बॉलीवूडसह मराठी कलाकारांनी प्रतिक्रियेद्वारे शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. मिथिला पालकर, दिप्ती देवी अशा अनेक कलाकारांनी यशराज व अल्पनाला शुभेच्छा दिल्या आहेत.

## हृता दुर्गुळेच्या 'कन्नी'चा ट्रेलर

मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री हृता दुर्गुळे (HRUTA DURGULE) आणि अजिंक्य राऊत (AJINKYA RAUT) सध्या त्यांच्या आगामी 'कन्नी' (KANNI) या सिनेमामुळे चर्चेत आहेत. लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या सिनेमाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. टाळ्या, शिट्यांच्या जल्लोषात हृता दुर्गुळेच्या 'कन्नी'चा ट्रेलर आऊट करण्यात आला आहे. ‘कन्नी’ चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा नुकताच दणक्यात पार पडला. यावेळी चित्रपटातील कलाकार ऋता दुर्गुळे, शुभंकर तावडे, वल्लरी विराज, ऋषी मनोहर आणि अजिंक्य राऊत यांनी चित्रपटातील गाण्यांवर धमाकेदार परफॉर्मन्स सादर केले. या सोहळ्यात अधिक रंगत आणली ती गाण्यांच्या लाईव्ह परफॉर्मन्सने. एकंदरच टाळ्या, शिट्या, धमाल असे उत्साही वातावरण होते. कलाकारांनी यावेळी काही मजेदार किस्सेही शेअर केले. या सोहळ्याला चित्रपटाच्या संपूर्ण टीमसह अनेकांची उपस्थित होती. समीर जोशी लिखित, दिग्दर्शित ‘कन्नी’ चित्रपट येत्या 8 मार्च रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाची निर्मिती अमित भरगड, गगन मेश्राम, वैभव भोर, सनी राजानी यांनी केली आहे. चित्रपटाची खासियत म्हणजे अमित भरगड, गगन मेश्राम आणि सनी राजानी यांचा बऱ्याच बॉलिवूड चित्रपटांमध्ये सहभाग आहे आणि त्यांचे सहकार्य ‘कन्नी’ला लाभले आहे.



## आता जबाबदारी आणखी वाढली

वा रंगकर्मी ऋतुजा बागवेलाअभिनयासाठी संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. अभिनयासाठी तिला हा पुरस्कार जाहीर झाला असून सर्वत्र तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आता जबाबदारी आणखी वाढली असल्याची प्रतिक्रिया अभिनेत्रीने दिली आहे. संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर एबीपी माझासोबत बोलताना ऋतुजा बागवे म्हणाली,"संगीत नाटक अकादमी"चा पुरस्कार जाहीर झाल्याचा आनंद आहे. एकांकिकांपासून सुरू झालेला हा प्रवास थक्क करणारा आहे. संगीत नाटक अकादमीचा मानाचा पुरस्कार आपल्याला जाहीर झालाय यावर सुरुवातीला विश्वास बसत नव्हता. पण नंतर शुभेच्छांचा वर्षाव व्हायरला सुरुवात झाली".ऋतुजा म्हणते,"संगीत नाटक अकादमी"चा पुरस्कार जाहीर झाल्याने कृतज्ञनेची भावना जास्त आहे. करिअरच्या सुरुवातीला हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यामुळे आणखी जबाबदारी वाढली आहे. पुढे कोणतही काम करताना या जबाबदारीनेच मी करेल". ऋतुजा बागवे अभिनीत 'अनन्या' हे नाटक चांगलच गाजलं. या भूमिकेसाठी तिने खूप मेहनत घेतली होती. त्याबद्दल बोलताना ऋतुजा म्हणाली,"अनन्याने मला खूप काही दिलं आहे. अभिनेत्री म्हणून आदर मिळवून देण्यापासून ते ओळख मिळवून देण्यापर्यंत अनेक गोष्टी अनन्याने दिल्या आहेत. आजही लोक अनन्या म्हणून मला ओळखतात. यापुढे अनेक चॅलेंजिंग भूमिका साकारण्याची माझी इच्छा आहे. सध्या माझा कोणताही ड्रीम रोल नाही. खूप वैविध्यपूर्ण भूमिका मला करायच्या आहेत". महाराष्ट्र भूषण ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ (ASHOK SARAF) यांना संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच युवा रंगकर्मी ऋतुजा बागवे, ढोलकीवादक विजय चव्हाण, शास्त्रीय गायिका कलापिनी कोमकली, नंदिनी गुजर, सिद्धी उपाध्ये, महेश सातारकर, प्रमिला सूर्यवंशी, अनुजा झोकरकर, सारंग कुलकर्णी, नागेश आडगावकर आणि प्रियंका ठाकूर यांनाही हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.ऋतुजा बागवेने नाट्यक्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी तिला संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. 25 हजार रुपये, ताम्रपत्र आणि शाल असं या पुरस्काराचं स्वरूप असणार आहे.

## “घटस्फोट आणि माझं प्रोफेशन

परफेक्शनिस्ट आमिर खान आणि चित्रपट निर्माती किरण राव १५ वर्षांच्या संसारानंतर २०२१ मध्ये वेगळे झाले. त्यांच्या मुलाचा (आझादचा) ते दोघे मिळून सांभाळ करतात. अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत किरण रावने आझादला कोणताही त्रास होऊ न देता, सहजपणे घेतलेल्या त्यांच्या घटस्फोटाविषयी सांगितले. डीएनएला दिलेल्या मुलाखतीत, किरण राव आणि आमिर खानला त्यांच नातं का बदलावंसं वाटलं? याबाबत किरण रावने खुलासा केला. किरण राव म्हणाली, “घटस्फोट आणि माझं प्रोफेशन या दोन्ही माझ्या वैयक्तिक गोष्टी मी सहजपणे सांभाळू शकले. आम्हाला आमच्या नात्याची व्याख्या बदलायची आहे, असा निर्णय आम्ही दोघांनी घेतला. आम्ही सहजरीत्या वेगळे झालो. कारण- सर्वांसमोर वेगळं होण्याचा निर्णय घेऊन आम्हाला आझादला दुखवायचं नव्हतं.”वेगळं होण्याचा निर्णय त्यांनी कोरोनाच्या काळात घेतल्यामुळे एकाच ठिकाणी राहून घटस्फोटाचा निर्णय घेण्यास त्यांना मदत झाली. किरण म्हणाली, “आम्ही खूप नशीबवान होतो. कारण- आम्ही दोघेही त्यावेळी एकाच घरात राहत होतो. त्या निर्णयानंतरही आमचं आयुष्य तेवढं बदललं नाही.”किरण पुढे म्हणाली, “कोविडमुळे आम्ही खूप वेळ एकत्र घालवला. आम्ही एकत्र काम करतोय. कामासाठी एकमेकांवर अजूनही अवलंबून आहोत याची मला खूप कदर आहे.”दरम्यान, किरणच्या कामाबद्दल सांगायचे झाले, तर किरण सध्या तिच्या आगामी चित्रपट ‘लापता लेडीज’च्या प्रतीक्षेत आहे.



## कतरिनाबरोबरच्या नात्याबाबत भाष्य

बॉलीवूड किंग शाहरुख खान नेहमी चर्चेत असतो. अभिनयाच्या जोरावर शाहरुखने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. सोशल मीडियावर शाहरुख मोठ्या प्रमाणात सक्रिय असतो. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करीत तो चाहत्यांना अपडेट देत असतो. जगभरात शाहरुखचे लाखो चाहते आहेत. शाहरुखबद्दल प्रत्येक गोष्ट जाणून घेण्यास चाहते नेहमीच उत्सुक असतात.शाहरुखने टेलिव्हिजनवरून करिअरला सुरुवात केली. मालिकेपासून चित्रपटांपर्यंतचा शाहरुखचा प्रवास म्हणावा तेवढा सोपा नव्हता. शाहरुखच्या कठीण काळात त्याला मदत केली ती निर्माते विवेक वासवानी यांनी. वासवानी यांनी शाहरुखला चित्रपटात केवळ लॉंचच केले नाही, तर संघर्षमय काळात त्याला आपल्या घरी राहण्यास जागाही दिली होती. एकेकाळी विवेक व शाहरुख खास मित्र मानले जायचे. अनेक किस्से सांगितले आहेत.सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत विवेक यांनी शाहरुखबाबत अनेक खुलासे केले आहेत. ते म्हणाले, “शाहरुख आणि मी एकमेकांशी बोलतही नाही आणि भेटतही नाही. पण जेव्हा कधी आम्ही एकमेकांना भेटतो, तेव्हा आम्हाला आम्ही कालच भेटलो होतो.

अंतिम फेरीत मिळवलं स्थान

रहीमने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली

# 'सुपर ओव्हर'मध्ये बांगलादेशचा विजय

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**एशिया कप रायजिंग स्टार्स २०२५ स्पर्धेतील पहिल्या सेमीफायनलचा सामना भारत अ आणि बांगलादेश अ या दोन्ही संघांमध्ये पार पडला. रोहा येथे पार पडलेल्या या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून बांगलादेशला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं.**

## बांगलादेशचा प्रथम फलंदाजीचा निर्णय




प्रथम फलंदाजी करताना बांगलादेश अ संघाने १९४ धावांचा डोंगर उभारून भारतासमोर विजयासाठी १९५ धावांचं आव्हान ठेवलं. हा सामना बरोबरीत राहिला. शेवटी सुपर ओव्हरमध्ये बांगलादेश अ संघाने भारतावर विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाकडून वैभव सूर्यवंशीने ३८ धावांची ताबडतोड सुरुवात करून दिली. त्यानंतर प्रियांश आर्यने ४४ धावा चोपल्या. शेवटी जितेश शर्माने ३३ आणि नेहाल वढेराने नाबाद ३२ धावांची खेळी करून भारतीय संघाला विजयाच्या उंबरठ्यावर पोहोचवलं. शेवटच्या षटकात विजयासाठी १६ धावा करायच्या होत्या. शेवटी आशुतोष शर्माने चौकार आणि षटकार मारले. पण २ चेंडूत ४ धावांची गरज असताना आशुतोष शर्मा बाद झाला. त्यामुळे जिंकण्यासाठी १ चेंडूत ४ आणि सुपर ओव्हरसाठी ३ धावा करायच्या होत्या. हर्ष दुबेने धावून ३ धावा पूर्ण केल्या आणि सामना बरोबरीत सुटला.सुपर ओव्हरमध्ये भारतीय संघाकडून फलंदाजीला आलेला जितेश शर्मा पहिल्याच चेंडूवर बोल्ड झाला. त्यानंतर दुसऱ्या चेंडूवर जितेश शर्मा झेलबाद झाला. बांगलादेशला विजयासाठी १ धाव करायची होती. बांगलादेशकडून धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेला यासिर अलीदेखील पहिल्याच चेंडूवर बाद झाला.

दुसरा चेंडू सुयशने वाईड टाकला. पण या चेंडूवर जितेश शर्माकडे स्टंम्पिंगची संधी होती. ही संधी हुकली आणि भारताचा पराभव झाला.या भारतीय अ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या बांगलादेश अ संघाने २० षटकांअखेर ६ गडी बाद १९४ धावा केल्या. बांगलादेश अ संघाकडून फलंदाजी करताना सलामीला आलेल्या हबीबूर रहमान सोहनने ६५ धावांची दमदार सलामी दिली. त्यानंतर जिशान आलमने २६ धावांची खेळी केली. तर जावद अब्रारने १३ धावा केल्या. कर्णधार अकबर अली अवघ्या ९ धावा करत माघारी परतला.शेवटी मेहरोबने ताबडतोड फटकेबाजी करत नाबाद ४८ धावांची खेळी केली. तर यासिर अली १७ धावांवर नाबाद राहिला. या खेळीच्या बळावर

## ६ गडी बाद १९४ धावा केल्या

दुसऱ्या चेंडूवर जितेश शर्मा झेलबाद झाला. बांगलादेशला विजयासाठी १ धाव करायची होती. बांगलादेशकडून धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेला यासिर अलीदेखील पहिल्याच चेंडूवर बाद झाला. दुसरा चेंडू सुयशने वाईड टाकला. पण या चेंडूवर जितेश शर्माकडे स्टंम्पिंगची संधी होती.या भारतीय अ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या बांगलादेश अ संघाने २० षटकांअखेर ६ गडी बाद १९४ धावा केल्या.

बांगलादेशने १९४ धावांपर्यंत मजल मारली. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना गुरजपनीतने सर्वाधिक २ गडी बाद केले. तर हर्ष दुबे, सुयश शर्मा, रमनदीप सिंग आणि नमन धीर यांनी प्रत्येकी १-१ गडी बाद केले.एशिया कप रायजिंग स्टार्स २०२५ स्पर्धेतील पहिल्या सेमीफायनलचा सामना भारत अ आणि बांगलादेश अ या दोन्ही संघांमध्ये पार पडला. रोहा येथे पार पडलेल्या या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून बांगलादेशला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेश अ संघाने १९४ धावांचा डोंगर उभारून भारतासमोर विजयासाठी १९५ धावांचं आव्हान ठेवलं. हा सामना बरोबरीत राहिला. शेवटी सुपर ओव्हरमध्ये बांगलादेश अ संघाने भारतावर विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे.या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाकडून वैभव सूर्यवंशीने ३८ धावांची ताबडतोड सुरुवात करून दिली. त्यानंतर प्रियांश आर्यने ४४ धावा चोपल्या. शेवटी जितेश शर्माने ३३ आणि नेहाल वढेराने नाबाद ३२ धावांची खेळी करून भारतीय संघाला विजयाच्या उंबरठ्यावर पोहोचवलं. शेवटच्या षटकात विजयासाठी १६ धावा करायच्या होत्या. शेवटी आशुतोष शर्माने चौकार आणि षटकार मारले. पण २ चेंडूत ४ धावांची गरज असताना आशुतोष शर्मा बाद झाला. त्यामुळे जिंकण्यासाठी १ चेंडूत ४ आणि सुपर ओव्हरसाठी ३ धावा करायच्या होत्या. हर्ष दुबेने धावून ३ धावा पूर्ण केल्या आणि सामना बरोबरीत सुटला.

# लाईव्ह सामन्यात हाय व्होल्टेज ड्रामा!

## अ‍ॅशेस मालिका : हेड-डकेट मैदानात भिडले; व्हिडीओ व्हायरल

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंग्लंडचा संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. या मालिकेला अ‍ॅशेस मालिका असं म्हणतात. दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांची मालिका रंगणार आहे. या मालिकेतील पहिला सामना पर्थच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यातील पहिल्या दिवशी गोलंदाजांचा बोलबाला पाहायला मिळाला आहे.**




नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या इंग्लंडचा पहिला डाव अवघ्या १७२ धावांवर आटोपला. त्यानंतर पहिल्या डावात फलंदाजीला आलेल्या ऑस्ट्रेलियालाही लागोपाठ मोठे धक्के बसले. यादरम्यान ट्रॅव्हिस हेड आणि बेन डकेट यांच्यात बाचाबाची झाल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. अ‍ॅशेस मालिका म्हटलं की वाद होणारच. ही मालिका जिंकणं म्हणजे दोन्ही संघांसाठी वर्ल्डकप जिंकण्यापेक्षा कमी नसतं. त्यामुळे मालिका जिंकण्यासाठी दोन्ही संघातील खेळाडू पूर्ण जोर लावतात. त्यामुळे एकमेकांना चिडवणं, फलंदाजांची एकाग्रता भंग करण्यासाठी क्षेत्ररक्षक स्लेजिंग करतात. हे अ‍ॅशेस मालिकेत पाहायला मिळणं काही नवीन नाही. दरम्यान या सामन्यातही असंच काहीसं चित्र पाहायला मिळालं. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होऊ लागला आहे.तर झाले असे की, ऑस्ट्रेलियाची पहिल्या डावातील फलंदाजी सुरू असताना, मार्क वूडचा बाऊन्सर कॅमरून ग्रीनच्या हेल्मेटला जाऊन लागला. वूडने हा चेंडू ताशी १४७.१ च्या गतीने टाकला होता. टप्पा पडताच हा चेंडू वेगाने आत आला आणि ग्रीनच्या हेल्मेटला जाऊन आदळला. चेंडू लागताच ग्रीनचा तोल गेला आणि तो यष्टीर आदळणार होता.

## प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय

इतक्यात त्याने स्वत:ला सावरलं. पण चेंडू हेल्मेटला लागल्याने फिजिओ मैदानात आले आणि सामना थांबवावा लागला. ड्रिंक्स ब्रेकच्या वेळी बेन डकेट ट्रॅव्हिस हेडच्या जवळ आला आणि काहीतरी म्हणाला. ट्रॅव्हिस हेडनेही त्याला जोरदार प्रत्युत्तर दिलं. शेवटी जो रूटने मध्यस्थी केली.या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज™
ePaper
। शनिवार ।
। दि. 22 नोव्हेंबर 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या

# बांगलादेशींचा आता "बंदोबस्त"!

### गृहराज्य मंत्री योगेश कदम यांचे निर्देश; बांगलादेशी विरोधातील कारवाई होणार तीव्र

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिखली-कुदळवाडी परिसरातील बेकायदेशीर भंगार दुकाने, अनधिकृत बांधकामे आणि बांगलादेशी नागरिकांच्या हालचालींवर राज्य सरकार आणि पोलिस प्रशासन आणखी कठोर भूमिकेत आले असून, सर्व यंत्रणांना 'नो-टॉलरन्स' मोडमध्ये कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. गृह (शहरे) विभागाने कुदळवाडी परिसरातील बेकायदेशीर भंगार अड्ड्यांवर तातडीने कारवाई करण्याची सक्त सूचना दिली आहे, तर पिंपरी-चिंचवड पोलिसांनीही बांगलादेशी नागरिक आढळून आल्यामुळे पुढील तपास व अटक कारवाया आणखी कठोर होणार आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेने फेब्रुवारी 2025 मध्ये चिखली-कुदळवाडीत मोठी अतिक्रमण विरोधी मोहीम राबवून हजारो अनधिकृत झोपड्या, पत्राशेड, बांधकामे, भंगार अड्डे आणि अवैध कारखान्यांना जमीनदोस्त केले होते. ही कारवाई इंद्रायणी नदीचे प्रदूषण रोखणे, परिसराचा नियोजित विकास अंमलात आणणे आणि परिसरात वावरणाऱ्या बांगलादेशी व रोहिंग्या घुसखोरांच्या बिमोडासाठी केली होती. या कारवाईनंतरही काही अनधिकृत भंगार दुकानांनी पुन्हा डोके वर काढल्याने शासनाने आता अधिक कठोर पवित्रा घेतला आहे.

वास्तविक, बांगलादेशी आणि रोहिंग्यांच्या बेकायदेशीर वास्तव्याबाबत आमदार महेश लांडगे यांनी राज्याच्या गृहमंत्रालयाकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर गृहविभागाने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडून अहवाल मागवला होता. बेकायदेशीर भंगार दुकाने आणि बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई केली आहे. या पुढील काळातही कारवाई करण्यात येईल, असे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी निर्देश दिले आहेत.

### गृहविभागाचे आदेश...

शासनाने 27 जून 2025 रोजी विशेष परिपत्रक काढून चिखली-कुदळवाडी परिसरातील अनधिकृत बांधकामे आणि भंगार व्यवसायांवर समन्वित मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. पोलिस आयुक्तांनी दिलेल्या अहवालानुसार, परिसरात बांगलादेशी नागरिक आढळल्याने अटक, तपास, सत्यापन व दस्तऐवज छाननीची कारवाई सतत आणि तीव्र पद्धतीने केली जाणार आहे. महापालिका, पोलिस आणि महसूल विभाग संयुक्त मोहीम राबविणार आहेत.

**बांगलादेशी घुसखोरांचा पर्दाफाश**

चिखली पोलिसांच्या कारवाईत 27 मार्च 2025 रोजी तळवडे येथे दोन महिला आणि एक किशोरवयीन मुलगा बांगलादेशी असल्याचे उघड झाले. त्यांचा टुरिस्ट व्हिसा 2022 मध्येच संपला होता, तरीही ते भारतात बेकायदेशीरपणे राहत होते. तपासात मोहम्मद राणा मोहम्मद सलाम शेख याने त्यांचे पासपोर्ट जाळून पुरावे नष्ट केल्याचे, तसेच आधार, पॅन आणि मतदान ओळखपत्रे बनवून 'भारतीय' ओळख तयार केल्याचे समोर आले. या प्रकरणात परकीय नागरिक कायदा, पारपत्र अधिनियम आणि फसवणुकीचे गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत.

# अनधिकृत प्लॉटिंगवर पीएमआरडीएची धडक कारवाई !

### पुरंदरमध्ये बेकायदा कृत्यांना लगाम: सहआयुक्त डॉ. दिप्ती सूर्यवंशी-पाटील यांची माहिती

। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुरंदर तालुक्यात वाढत्या अनधिकृत प्लॉटिंगला आळा घालण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) सुरू केलेल्या मोहीमेला जोरदार प्रतिसाद मिळत असून, १९ नोव्हेंबरपासून सलग कारवाई सुरू आहे. गेल्या दोन दिवसांत तीन गावांतील अनधिकृत प्लॉटिंगवर हातोडा पडला आहे. ही मोहीम सोमवारी (दि. २४)देखील सुरुच राहणार असल्याची माहिती सहआयुक्त डॉ. दिप्ती सूर्यवंशी-पाटील यांनी दिली.**

अनधिकृत प्लॉटिंगमुळे होत असलेल्या नागरिकांच्या फसवणुकीविरोधात पीएमआरडीएला मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींना गांभीर्याने घेत प्राधिकरणाने पुरंदर तालुक्यातील १५ गावांचे सर्वेक्षण पूर्ण केले. त्यानंतर अनधिकृत प्लॉटिंगविरोधात मोठ्या प्रमाणावर मोहीम राबविण्यात येत आहे.



गेल्या दोन दिवसांत मौजे देवडी (गट क्र. १७०), मौजे आंबोडी (गट क्र.१५९), तसेच मौजे काळेवाडी (गट क्र. १७०६) येथील बेकायदेशीर प्लॉटिंग, अंतर्गत रस्ते आणि डिमार्केशन पोल यांचे निष्कासन करण्यात आले. या गावांतील शंकर बाठे, निखिल बोरकर, यशोदीप बोरकर तसेच गुलाब झेंडे / कातोबा डेव्हलपर्स (गणेश पार्क) यांच्या अनधिकृत कामांवर कारवाई झाली.

**नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक...**

ही मोहीम महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला आणि पोलिस अधीक्षक (दक्षता अधिकारी) अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे. सहआयुक्त डॉ. दिप्ती सूर्यवंशी-पाटील, उपायुक्त किरणकुमार काकडे, तहसीलदार आशा होळकर, तसेच शाखा अभियंते प्रितम चव्हाण, शशिभूषण होले, शरद खोमणे, हरीष माने, प्रमोद सोनवणे व संकेत बडे यांनी ही कारवाई अंमलात आणली. शासनाची कोणतीही परवानगी न घेता ले-आऊट तयार करून तात्पुरते रस्ते दाखवण्याची प्रवृत्ती वाढत असल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. अशा अनधिकृत प्लॉट्सना बांधकाम परवानगी मिळत नसल्याने प्लॉट खरेदी करताना सर्व कागदपत्रांची काटेकोर तपासणी करावी, असे आवाहन सहआयुक्त डॉ. सूर्यवंशी-पाटील यांनी केले.

### मिशन- PCMC: तळवडेतील नावे चिखलीत

# माजी नगरसेवक शांताराम बापू भालेकर आक्रमक!

## निवडणूक विभागाकडे हरकती नोंदवण्याचे आवाहन : निवडणुकीसाठी मतदार याद्यांमध्ये सुधारणीची मागणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**तळवडे येथील भारतीय जनता पार्टीचे माजी नगरसेवक शांताराम बापू भालेकर यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक 12 मधील तळवडे गावठाण येथील मतदारांची नावे चिखली प्रभागात समाविष्ट झाल्याची शंका उपस्थित केली आहे. संबंधित मतदारांनी आपला मतदानाचा हक्क त्यांच्या वास्तव्य ठिकाणाच्या प्रभागात मिळावा आणि यासाठी तातडीने हरकती घ्याव्यात. प्रशासनाने मतदार यादी दुरूस्ती करावी, अशी आक्रमक भूमिका भालेकर यांनी घेतली आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदारांची प्रारुप यादी प्रसिद्ध केली असून, यादीतील त्रुटी सुधारण्यासाठी हरकती आणि सूचना मागवल्या आहेत. त्यासाठी दि. 27 नोव्हेंबर पर्यंत मुदत निश्चित केली आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी मतदार यादींवर अभ्यास सुरू केला असून, दुरूस्तीसाठी प्रयत्न केले जात आहेत. तळवडे गावठाण येथील यादी क्रमांक 7 चा समावेश चिखली प्रभाग- 1 मध्ये केला गेला आहे. त्यामुळे भालेकर यांनी याबाबत आग्रही भूमिका घेतली आहे. विशेष म्हणजे, सदर नावे नजरचुकीने गेली आहेत की, राजकीय फायदा उठवण्यासाठी असा खोडसाळपणा केला का? अशा संशयही भालेकर यांनी व्यक्त केला आहे.

शांताराम बापू भालेकर म्हणाले की, प्रभाग क्रमांक 12 मधील अनेक मतदारांची नावे लगतच्या प्रभागात गेली आहेत. त्यामुळे मतदारांनी आपल्या प्रभागातील मतदार यादीतच आपले नाव असल्याबाबत खात्री करावी. नसेल,तर नाव समाविष्ट करण्याबाबत अर्ज करावा, जेणेकरून अंतिम यादीत योग्य सुधारणा करता येतील. हरकतीसाठी अर्ज करताना आधार कार्ड किंवा ओळखपत्र आणि पत्त्याचे पुरावे जोडणे अत्यावश्यक आहे. BLO आणि महापालिका प्रशासन अर्जाची पडताळणी करून योग्य सुधारणा करतील, ज्यामुळे मतदारांचा मतदानाचा हक्क त्यांच्या वास्तव प्रभागात सुनिश्चित होईल.

यासाठी मतदारांनी माझ्या जनसंपर्क कार्यालयात भेट द्यावी आणि हरकतीचा अर्ज मिळवावा. तसेच, अधिक माहितीसाठी श्री भालेकर : 8888971010 यांच्याशी संपर्क साधावा.

> “महानगरपालिकेच्या मतदार यादीत तळवडे गावठाणमधील यादी क्रमांक- 7 लगतचा प्रभाग चिखलीमध्ये समाविष्ट केली आहे. ती यादी दुरूस्त करुन प्रभाग-12 तळवडे गावठाणमध्ये जोडावी. प्रत्येक मतदाराला त्यांच्या वास्तव्य करीत असलेल्या प्रभागात मतदानाचा हक्क मिळावा यासाठी प्रशासनाने त्वरित दुरूस्ती करावी. तळवडे प्रभागातील सूज्ञ मतदारांनी आपले नाव प्रारुप मतदार यादीत आहे किंवा नाही याबाबत खात्री करावी. माझ्या जनसंपर्क कार्यालयात संपर्क करावा. मतदार यादीत नाव नसेल, तर हरकतींचा अर्ज भरावा आणि मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन करतो.”
>
> **–शांताराम बापू भालेकर, माजी नगरसेवक**

# महापालिका प्रशासनातर्फे नवीन “जलकुंभ“

## परिसरातील पाणी पुरवठा सुरळीत होण्यास होणार मदत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड: पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने वाकड परिसरातील कावेरीनगर येथे २५ लाख लिटर क्षमतेची पाण्याची उंच टाकी उभारण्यात आली आहे. या टाकीतून आजपासून पाणीपुरवठा देखील सुरू करण्यात आला आहे. या पाण्याच्या टाकीमुळे वाकड परिसरातील कस्पटेवस्ती, पिंक सिटी रस्ता परिसर, वेणूनगर, कावेरीनगर, पोलीस कॉलनी, दत्त मंदिर रस्ता आदी परिसरातील गृहसंकुले अशा विविध भागातील पाणीपुरवठा सुरळीत होणार आहे.**



**कावेरीनगर येथे 25 लाख लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीचे लोकार्पण**

कावेरीनगर,वाकड येथील वॉर्ड क्र. ५३, स. नं. २०८ मध्ये महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने ५ कोटी ८५ लाख रू.खर्च करून उभारण्यात आलेल्या २५ लाख लिटर्स क्षमतेच्या पाण्याची उंच टाकी व संपवेलचे उद्‌घाटन आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, स्थायी समितीच्या माजी सभापती ममता गायकवाड, माजी नगरसदस्य विनायक गायकवाड, संदीप कस्पटे, आरती चौंधे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, अनिल भालसाखळे, क्षेत्रीय अधिकारी आश्विनी भोसले, कार्यकारी अभियंता महेश बरिदे, महेश कावळे, हेमंत देसाई, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, उपअभियंता प्रविण धुमाळ, मनोज बोरसे, विश्वनाथ पाडवी,अमरजित म्हस्के,सामाजिक कार्यकर्ते सचिन साठे,ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अनिल देशमुख,अध्यक्षा वृषालीताई मरळ, ग्लेग इंजिनिअर्सचे मोहनलाल शर्मा, यांच्यासह ज्येष्ठ नागरिक,विविध सामाजिक क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेने कावेरीनगर परिसरात उभारण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीचे काम उच्च दर्जाचे केले आहे. शहरातील नागरिकांना चांगले रस्ते, मुबलक पाणी, आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका नेहमीच प्रयत्नशील असते. स्वच्छतेच्या बाबतीत आपल्या पिंपरी चिंचवड शहराचा देशात नावलौकिक आहे. आपल्या शहराचा झपाट्याने विकास होत असून शहराची लोकसंख्या देखील जवळपास ३५ लाखांपर्यंत गेली आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करून येणाऱ्या काळात शहरातील सर्व नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रयत्नशील असून त्यांना राज्य सरकारकडून आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी सहकार्य केले जाईल, असे आमदार शंकर जगताप बोलताना म्हणाले.

**नवीन पंप हाऊसची उभारणी**

कावेरीनगर येथे उभारण्यात आलेली नवीन टाकी नियमितपणे भरून परिसराला सुरळित पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाच्या वतीने येथे नवीन पंप हाऊस उभारण्यात आले आहे. ही टाकी भरण्यासाठी पंपिंग मशिनरी व विद्युत पुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली असून त्यासाठी ५० एचपी क्षमतेचे २ वर्किंग आणि १ स्टँडबाय पंप बसवण्यात आले आहेत,त्यामुळे ही संपूर्ण टाकी ६ तासातच भरणार आहे. या पंप हाऊससाठी २०० केव्हीए स्वतंत्र वीज भार मंजूर असून त्यासाठी स्वतंत्र २०० केव्हीए क्षमतेचे रोहित्र संच व उच्च दाब नियंत्रणासाठी २ आरएमयू देखील बसविण्यात आले आहेत.

> आज पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून वाकड परिसरात २५ लाख लिटरची पाण्याची टाकी उभी राहिली आहे. यामुळे विविध भागातील पाणीपुरवठा सुरळित होईल. शहरातील प्रत्येक नागरिकासाठी मुबलक पाणीपुरवठा मिळणे ही महत्त्वाची बाब असते, त्यामुळे शहरामध्ये होणारा पाणीपुरवठा हा मुबलक व सुरळित होणे आवश्यक असते. यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभी करण्यासाठी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत सातत्याने विविध प्रकल्प हाती घेतले जात आहेत.
>
> **–विजयकुमार खोराटे,** अतिरिक्त आयुक्त.

## चऱ्होलीतील सामाजिक कार्यकर्त्या अनुराधा साळुंके यांच्याकडून

# सेवाभावी वृत्तीचे आदर्शवत उदाहरण!

### सामाजिक कार्यकर्त्या अनुराधा साळुंके यांनी रक्तदान करत दिले रुग्णाला जीवनदान

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चऱ्होली परिसरातील अनुराधा साळुंके यांनी एका गंभीर रुग्णाचे प्राण वाचवण्यासाठी केलेली धावपळ आणि तत्परता सध्या सर्वत्र कौतुकाचा विषय ठरत आहे. परिसरातील एका व्यक्तीची प्रकृती अचानक बिघडली आणि त्याला तातडीने रक्ताची आवश्यकता भासली. रुग्णालयाच्या रक्तपेढीत आवश्यक रक्तगटाचा साठा उपलब्ध नसल्यामुळे परिस्थिती गंभीर बनली होती**



ही बाब कळताच चऱ्होलीतील अनुराधा साळुंके यांनी एक क्षणही दवडला नाही. आणि तातडीने रुग्णालयात धाव घेतली. साळुंके यांचा रक्तगट ओ निगेटिव्ह असल्याने तो रुग्णाच्या आवश्यकतेशी जुळत असल्याची माहिती मिळताच त्यांनी तत्परतेने रक्तदान करण्याचा निर्णय घेतला.

#### संकटाच्या काळात मदतीला धावून जाणारी सेवाभावी वृत्ती

अनुराधा साळुंके यांचे हे कार्य मानवतेचा खरा अर्थ अधोरेखित करणारे आहे. संकटाच्या काळात मदतीला धावून जाणाऱ्या अशा व्यक्तींमुळे समाज अधिक संवेदनशील आणि सशक्त बनतो. ही भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या या सेवाभावी कृतीमुळे चऱ्होली परिसरात मानवतेचा उज्ज्वल संदेश पोहोचला आहे.

रुग्णालयात पोहोचल्यावर सर्व वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण करून त्यांनी आवश्यक ते रक्त देऊन रुग्णाला दिलासा मिळवून दिला.

अनुराधा साळुंके यांचे रुग्णांच्या नातेवाईकांनी आभार मानले. योग्य वेळी आमच्या पेशंटला रक्त मिळाले. हे आमच्या साठी अत्यंत महत्वाचे ठरले आणि त्यामुळे आमच्या रुग्णांचा जीव वाचवण्यात मोठी मदत झाली.

अनुराधा साळुंके यांच्या या कृतीमुळे एका कुटुंबावर आलेले संकट दूर झाले असून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जात आहे.

परिसरातील नागरिक, समाजसेवी संस्था आणि स्थानिक प्रतिनिधींनी त्यांच्या या मदतीचे मनापासून कौतुक केले आहे. मदतीला तत्पर राहणारी त्यांची वृत्ती आणि समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा प्रेरणा देणारी असल्याचे सर्वांनी नमूद केले आहे

# जेजुरी गडावर चंपाषष्ठी उत्सवाची पहाट

### शंकराचार्यांच्या उपस्थितीत घटस्थापना; अध्यात्मिक सोहळा: गुरव-वीरकोळी घडशींकडून मोफत अन्नदान सेवा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या कुलदैवत खंडोबा-म्हाळसादेवींचा पारंपरिक चंपाषष्ठी उत्सव जेजुरी गडावर धार्मिक उत्साहात सुरू झाला असून, आज मार्गशीर्ष शुक्ल प्रतिपदेनिमित्त मुख्य उत्सवाचा प्रारंभ झाला. करवीरपीठाचे शंकराचार्य परमपूज्य आध्य श्री नृसिंह भारती यांच्या उपस्थितीत मुख्य उत्सव मूर्तींची घटस्थापना पारंपरिक वेदघोष आणि सनई-चौघड्याच्या निनादात करण्यात आली.**



मुख्य गाभाऱ्यातील स्वच्छता, पाखळणी आणि उरकणीची कामे पूर्ण झाल्यानंतर उत्सव मूर्ती बालद्वारीत नेण्यात आल्या. दुपारी बरोबर १२ वाजता शंकराचार्यांच्या शुभहस्ते विधिवत पूजा, अभिषेक आणि घटस्थापना सोहळा संपन्न झाला. या वेळी श्रीमार्तंड देवसंस्थानचे ट्रस्ट अध्यक्ष मंगेश घोणे, माजी विश्वस्त डॉ. प्रसाद खंडागळे, विश्वास पानसे, संदिप घोणे तसेच नगराध्यक्षपदाचे उमेदवार जयदीप बारभाई आदी मान्यवर उपस्थित होते.

पूजारी सेवेकरी वर्ग, वेदमूर्ती शशिकांत सेवेकरी, मंगेश खाडे गुरुजी यांच्या मंत्रोच्चारात पारंपरिक रीतीने पूजा पार पडली. या वेळी मार्गदर्शन करताना शंकराचार्य म्हणाले, “देवाकडे सतत काहीतरी मागत बसण्यापेक्षा गरजूंच्या सेवेसाठी पुढे सरसावणे हीच खरी उपासना. देवालयात राजकारणास स्थान नसावे.”

उत्सवादरम्यान दरवर्षीप्रमाणे सहा दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या पंचवीस वर्षांपासून येथील मंदिर उपासक गुरव वीर कोळी घडशी, कर्मचारी व सेवेकरी वर्ग विविध दानशूर भक्तांच्या सहकार्याने मोफत अन्नदान सेवा अखंडपणे चालवत आहेत.

उत्सवकाळात सात दिवस हजारो भाविकांना याचा लाभ मिळत असून, सेवाभावी कार्याची प्रशंसा सर्वत्र होत आहे. चंपाषष्ठी उत्सवाच्या निमित्ताने जेजुरी गडावर भक्तांची मोठी गर्दी उसळली असून, धार्मिक उत्साहात ‘यळकोट यळकोट जय मल्हार’चा जयघोष घुमत आहे.

> “देवाकडे हात पसरून मागण्यात नाही, तर त्याच्या लेकरांसाठी—गरीब, दुबळ्या आणि गरजूंसाठी हात पसरवून सेवा करण्यात खरी भक्ती आहे. देवालय हे मतभेदाचे नव्हे, तर प्रेम, शांतता आणि नि:स्वार्थ सेवाभावाचे केंद्र असावे.”
>
> **परमपूज्य नृसिंह भारती, शंकराचार्य करवीर पीठ**


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046